॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४८ ■ वर्ष २६ ■ अंक ०३ ■ जून २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या २८
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 26 ■ ISSUE NO 03 ■ June 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 28



## श्री शिवराज्याभिषेक : सुवर्णक्षण

# शिक्षणाच्या वाढत्या खर्चासाठी,
# आता मदत जनता बँकेची!



## जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजना

शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज

| देशांतर्गत शिक्षणासाठी | परदेशी शिक्षणासाठी | आकर्षक |
|---|---|---|
| ₹50* लाख | ₹1* कोटी | व्याजदर |

*अटी व नियम लागू

## जनता सहकारी बँक लि., पुणे

मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९

टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.jsblpune.bank.in

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष – सव्वीसावे : अंक ३ रा**

शके १९४८

**जून २०२६**

**संपादक**

**श्री. रविकांत कळंबकर**

ravi.kalambkar@gmail.com

**निवास**

**एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,**
**आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,**
**निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४**

अंक www.vhp.org संकेतस्थळावर उपलब्ध

**संपादक मंडळ**

श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

**संपादक मंडळ सदस्य**

श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

**पत्र व्यवहार**

व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

**मुद्रण स्थळ**

संवाद ट्रेडप्रिंट्स्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... श्रीशिवराज्याभिषेक
श्री. श्रीपाद श्रीकांत रामदासी .................... ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त .................... ०७

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................... १५

✦ अधिक मास : अध्यात्माचा पवित्र काळ
ॲड. स्वाती जेरे .................... १७

✦ विमानछत विच्छेदन प्रणाली
काशीनाथ देवधर .................... १९

✦ मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ
डॉ. सचिन लादे .................... २३

✦ मानसिक आरोग्य – मनःशांती
डॉ. संजीव दात्ये .................... २५

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

’हिंदुबोध’ मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**“Hindu Bodh” Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ।। हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा ।।

**हे हिंदूशक्ती संभूत दीप्तितम तेजा**
**हे हिंदू तपस्यापुत ईश्वरी ओजा**
**हे हिंदुश्री सौभाग्यभूतीच्या साजा**
**हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा**

**करी हिंदूराष्ट्र हे तुते, वंदना**
**करी अंत:करणज तुज, अभिनंदना**
**तव चरणी भक्तीच्या चर्ची चंदना**
**गुढाशा पुरवी त्या न कथु शकतो ज्या**
**हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा**

**ही शुद्धी ह्रदाची रामदास शीर डुलवी**
**जी बुद्धी पाच शाह्यास शत्रूच्या झुलवी**
**जी युक्ती कुटनीतीत खलासी बुडवी**
**जी शक्ती बलोन्मत्तास पदतली तुडवी**
**ती शुद्धी हेतूची कर्मी राहु दे**
**ती बुद्धी भाबड्या जीव लाभू दे**
**ती शक्ती श्रोणीतामाजी वाहु दे**

**दे मंत्र पुन्हा तो दिले समर्थे तुज ज्या**
**हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा**

**हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा**
**हे हिंदू नृसिंहा प्रभो शिवाजी राजा**

**कवी –**
**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# श्रीशिवराज्याभिषेक

## संपादकीय

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये अनेक अपूर्व अश्या घटना, प्रसंग घडले आहेत. त्यातील अत्यंत महत्वाची आणि कालातीत घटना म्हणजे, श्रीमंत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा हि होय. वास्तवात एखाद्या राजाचा राज्याभिषेक होणे हा प्रसंग जरी तत्कालीन समाज पद्धतीनुसार सामान्य असला तरी, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही घटना किंवा प्रसंग हा असामान्य होती असेच आम्हांस वाटते.

एखादी घटना जेंव्हा असामान्य म्हणून गणली जाते, तेंव्हा त्या घटनेचे पूर्वरंग आणि परिणाम हे दूरगामी असतात. श्री शिवराज्याभिषेकाचे देखील तसेच आहे.

शिवाजी महाराजांचे राज्य हे काही वंश परंपरेने चालत आलेलेकिंवा वारसा हक्काने प्राप्त झालेले राज्य नव्हते. शिवाजी महाराजांचे राज्य, स्व–धर्म, स्व–संस्कृती, स्व–भाषा यांचा स्वाभिमान तथा अवलंब असणारे स्व–राज्य होते. शिवरायांच्या जन्मापूर्वीची भारतीयांची परिस्थिती अत्यंत दयनीय तसेच परकीय आक्रमक आणि राज्यकर्ते यांच्या अत्याचाराखाली भरडली जाणारी अशीच होती. शिवरायांनी रोहिडेश्वरी स्वराज्य स्थापनेची शपथ वाहून सतत ३०–३५ वर्षे अविश्रांत परिश्रम करून, शिवपूर्व काळातील परिस्थिती पार बदलून टाकली. इथल्या भूमीपुत्राचा हरवलेला स्वाभिमान त्यांनी जागृत केला, माता भगिनींची होणारी विटंबना थांबवली, कृषीवल, व्यापारी, उदमी यांच्या उत्पन्नाचे संरक्षण तथा अभिवृद्धी केली. साधू, संन्यासी, गोसावी, ईश्वरभक्त, आदी मंडळींना धर्माचरण करण्यासाठी निर्विघ्न वातावरण निर्माण केले, देव देश आणि धर्म यांच्या साठी लढायला, झिजायला आणि त्यांचा सन्मान करायला शिकवले. अनेका अनेक प्रकारे रयतेचे कल्याण करून त्यांची अभिवृद्धी करणारे राज्यधोरण अवलंबले.

एकी कडे रयतेचा कल्याणकारी असणारा हा राजा, शत्रूसाठी मात्र कळिकाळचं होता, शिवरायांनी कोणा शत्रूस रणांगणात हरवले, कोणास सुलाह करून थांबविले, कोणास धाक दाखवून पळवून लावले, कोणास ठकवून भुलवून सैन्यासह जंगलात बुडवले, कधी मित्रभेद केला, कधी परस्पर दगा केला, कधी स्वतः शत्रूच्या शामियाना घुसून मारामारी करोन हुसकावून लावले, कोणास स्वतः जाऊन भेटले, कोणास भेटीस बोलावले, कोणास छापा मारून लुटले तर कोणास एकांगी करून दगे करोन फाडले. राज्य रक्षणासाठी नानाप्रकारे दुर्ग बांधले, काही शत्रूंचे मिळवले, काही डागडुजी करून उपयोगास आणले. अश्याप्रकारे, महाराजांनी जणू काही नूतन सृष्टीच निर्माण केली.

देवगिरीचे राज्य लयास गेल्यानंतर अभिषिक्त असा कोणताही हिंदू राजा झालाच नव्हता, त्यामुळे हिंदू सिंहासन आणि हिंदू राज्य पुन्हा स्थापन करून आपली जनता ही कोण्या जहागीरदाराची जनता नव्हे, आपण घातलेला घाट, केलेला खटाटोप हा काही पुंडावा नाही, आपल्या सवंगड्यानी दिलेले बलिदान हे काही स्वार्थपूर्ती साठी नाही तर त्याला एक उदात्त हेतू होता हे जनमानसात रुजवून या सर्व खटाटोपाला धार्मिक, सामाजिक आणि राजकीय प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी, शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला.

विद्वदचूडामणी, वेदोनारायण गागाभट्ट यांनी, छत्रपतींच्या राज्याभिषेकासाठी शिवराजाभिषेक प्रयोग : हा खासा ग्रंथच बनवला, शुभ काळ आणि मुहूर्त पाहून ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १५९६, ही तिथी निश्चित केली. हिंदूंचे उभवू पाहणारे सिंहासन शत्रूकडून नष्ट करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, हे जाणून ठराविक वेळेपर्यंत अभिषेक सोहळ्याची गुप्तता राखण्यात आली होती याचे संदर्भ ऐतिहासिक दस्त ऐवजातून पाहायला मिळतात.

वर सांगितलेल्या महाराजांचा राज्याभिषेकामागच्या उद्देशाचा मतितार्थ हा राज्याभिषेक विधी सुरु होताना, महाराजांनी केलेल्या संकल्पामध्येच आहे.

त्या संकल्पाचा काही अंश खालील प्रमाणे

''प्रजापरिपालनाधिकारसिद्धीद्वारा परमेश्वरप्रित्यर्थ साम्राज्यादिकफलप्राप्त्यर्थ गणेश पूजनं....... ( २ )

अर्थ : प्रजापालनाच्या अधिकाराने सिद्ध होण्यासाठी, परमेश्वराचे अधिष्ठान ठेवून साम्राज्य मिळण्यासाठी श्री गणेश पूजन

राज्याभिषेकाचा सोहळा एकंदरीत ७ दिवस धार्मिक विधी, संस्कार आणि ८ व्या दिवशी मंचकारोहण असा ऐसपैस आणि दिमाखदार होता. या अभिषेकामध्ये सर्व वर्णांनी एकत्रित भाग घेतला होता ही बाब तत्कालीन सामाजिकदृष्ट्या अलौकिक आहे.

याच प्रसंगी महाराजांनी स्वतः च्या नावानी नाणी पाडली, राज्याभिषेक शक सुरु केला मुख्य म्हणजे व्यवहारामध्ये प्रचलित असणाऱ्या १४०० फार्सी, उर्दू शब्दांना मराठी, संस्कृत प्रतिशब्द असणारा राजव्यवहार कोष निर्माण करून घेतला, राजव्यवहारात पत्रांचे असणारे किचकट मायने रद्द करून सोपे, सुटसुटीत, मुद्देसुत असे नवे मायने असणारी लेखन प्रशस्ती सुरु केली. विद्वान ब्राम्हण, पुरोहित, आचार्य, गोर गरीब यांना भरभरून दान धर्म केला, प्रतापगडाच्या श्री आदिशक्ती तुळजाभवानीला सव्वा मण सोन्याचे छत्र वाहिले. एकंदरीतच काय तर महापराक्रमी असणाऱ्या महाराजांनी आपला राज्याभिषेक संपूर्णत: धार्मिक पद्धतीने करून स्वधर्माचा सन्मानच केला. महाराजांनी सुवर्णरत्नजडित हिंदवी सिंहासन स्थापन करून, ज्या उदात्त हेतूने राजांच्या सवंगड्यांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले, त्या बलिदानाचे सार्थक केले. स्वतः सिंहासनारूढ होऊन यावनी राजसत्तांच्या छाताडावर हिंदूंचे सार्वभौम साम्राज्य स्थापन करून दाखवले.

त्यामुळेच शिवबखरकार अनंत सभासद म्हणतात तेच खरे,

छत्र जडावाचे मोतीलग झालरींचे करून मस्तकावर धरिलें. छत्रपती असे नाव चालविले. कागदीपत्री स्वस्तिश्री (राज्याभिषेक) शक सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला.... येणें प्रमाणें राजे सिंहासनारूढ झाले. या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा. मऱ्हाटा पादशाहा येवढा छत्रपती जाला. ही गोष्ट काही सामान्य झाली नाही (३)

संदर्भ :

(१) रामचंद्र अमात्य कृत आज्ञापत्र

(२) गागाभट्टकृत श्रीशिवराजाभिषेक प्रयोग :

(३) सभासद बखर.

**श्रीपाद रामदासी**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**



## पुणे पोलिस आयुक्तांना पत्र

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शरद पवार गटाचे प्रवक्ते श्री. विकास लवांडे यांनी दिनांक, १६ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता पत्रकार परिषद घेवून आपल्या पूर्व स्वभावानुसार भाव स्विकारून स्वतःचे पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी गरळ ओकली, त्यात त्यांनी 'वारकरी संप्रदायातील २० घुसखोर' म्हणून ज्यांच्यावर टीका केली, टीका करत असताना भाषेची व शब्दांची मर्यादा ओलांडत स्वतःची 'पात्रता – लायकी' दाखवण्याचा प्रयत्न लवांडेनी केला, वारकरी संप्रदाय हा सर्वसमावेशक असुन मुळात वेदप्रमाण मानणारा व आपल्या कुप्रथांवर आक्षेप घेत सर्वांना भक्ति–ज्ञान उपासनेचा अधिकार देणारा, सामाजिक समरसतेचा पुरस्कार करणारा, नामनिष्ठ ईश्वरनिष्ठांचा संप्रदाय आहे.

त्याच्या पाईकांवर या निधर्मी म्हणवणारे, ईश्वराच्या अस्तित्वावर शंका घेणारे, अश्रद्ध–नास्तिकांना कोणताही नैतिक वा व्यावहारिक अधिकार नाही. ज्यांच्या बद्दल बोलले गेले त्यांची संप्रदायातील समृद्ध पूर्वपरंपरा व समाजातील त्यांची समरसता, गोसेवा, व्यसनमुक्ती, संतवाङ्मय प्रसार व प्रचारातील सेवामग्नता, निरपेक्षता, समाजातील त्यांच्या विषयीची आस्था याचा कोणताही अभ्यास न करता हे महाशय आपल्या पाठीराख्यांच्या विचारानुसार तथ्यहीन बोलले. आमच्या श्रद्धास्थानांविषयी अश्लाघ्य बोलणाऱ्या या नतद्रष्टांवर अब्रुनुकसानीचा /धर्मिक भावना दुखविण्याचा तत्रीत गुन्हा दाखल करण्यात यावा.

देव–देश–धर्म या प्रति आपली निष्ठा कायम राखित या दुष्प्रवृत्तीला आपल्या सत्कार्याने, संस्कारांनी व सुसंघटित राहून कोणताही मतभेद– मनभेद–जातिभेद न येऊ देता दृढपणे विरोकरीत आहोत. विकास लवांडे जे बोलले त्याचा आम्ही विश्व हिंदू परिषद म्हणून.. निषेध! करतो !

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील संतपरंपरेचा आणि हिंदू धर्माच्या आस्थेचा मुख्य स्रोत आहे. लवांडे सारख्या व्यक्तीने असे फाजील वक्तव्य करून फक्त वारकरी संप्रदयाच्याच नाही तर समग्र हिंदू समाजाच्या आस्थेवर गरळ ओकली आहे. ऐन वारीच्या पार्श्वभूमीवर प्रकरण चिघळण्याधी या धर्मद्रेष्टा व्यक्तीस त्वरित अटक करून कारवाई करावी आशा आशयाचे पत्र मा.पोलीस उपायुक्त श्री कृषिकेश रावले साहेब यांच्या मार्फत पुणे पोलीस आयुक्तांना देण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र मंत्री श्री किशोरजी चव्हाण, बजरंग दल प्रदेश संयोजक श्री. नितीनजी महाजन, विभाग मंत्री केतजनी घोडके, विभाग सहमंत्री विजयेंद्रजी कांबळे, जिल्हा मंत्री शुभमजी मुळूक, संयोजक राजू कुडले, ऋषिकेश पंडित आदि अधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




## देशी गायींचे संवर्धन काळाची गरज

मंचर : देशी गायींचे दूध, शेण आणि मूत्र हे आरोग्य, शेती व पर्यावरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असून, त्यातून सेंद्रिय शेतीला चालना मिळते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते, असे प्रतिपादन वशिष्ठ गोशाळेचे प्रमुख व पंचगव्य सिद्ध डॉ. सुरेंद्र देव यांनी केले.

मंचर (ता. आंबेगाव) येथील शरदचंद्र पवार सभागृह, मार्केटयार्ड येथे विश्व हिंदू परिषद गोरक्षा विभाग, भीमाशंकर जिल्हा यांच्या वतीने झालेल्या गोभक्त मेळाव्यात ते बोलत होते. या प्रसंगी देशी गायी जतन व संवर्धन केंद्राचे प्रमुख डॉ. सोमनाथ माने, विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, गोसंवर्धन प्रमुख संतोष खामकर, रेणुका डुंबरे, रवींद्र पाबळे, प्रतीक शर्मा, गणेश बाणखेले, आरती काशिद, उज्वला खिल्लारी, मनिषा चासकर, छाया थोरात, माधुरी गेंगजे आदी उपस्थित होते. ह.भ.प. बाजीराव महाराज बांगर यांचे कीर्तन झाले. सूत्रसंचालन प्रा. आरती काशिद व हेमंत लोखंडे यांनी तर संतोष खामकर यांनी आभार मानले.





# बाल शिबिर २०२६ - वृत्तांत

धर्मगंगा सार्वजनिक ग्रंथालय व विश्व हिंदू परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११.५.२०२६ ते १६.५.२०२६ या कालावधीत बालशिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन संपूर्ण भगवद्‌गीता कंठस्थ असणारे, गीताव्रती मा. किशोरजी लोणकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी मुलांना श्रीमद्‌भगवद्‌गीतेविषयी माहिती दिली.

शिबिरामध्ये मुलांना दैनंदिन श्लोक, हस्तकला, चित्रकला, खेळ इ. शिकविण्यात आले. शिबिर शिक्षिका सौ. माधुरी कोळपे यांनी मुलांना सरस्वतीवंदनेची गीते शिकवली. सौ. गर्भे यांनी मुलांना दिनविशेषाचे महत्त्व, धर्मवीर संभाजी महाराजांचे चरित्र, देशभक्तीपर पद्य शिकवले तसेच विविध खेळ घेतले. संचालिका सौ. अनुजाताई कुलकर्णी यांनी मराठी व इंग्रजी अंकापासून चित्रकला शिकवली व मुलांना बोधपर कथाकथनही केले. कु. प्राची उपाध्ये यांनी मुलांना 'मातीचा पॉट' रंगवायला तसेच 'फ्रिज मॅग्नेट' तयार करायला शिकवले. या सर्व उपक्रमांमध्ये सर्व शिबिरार्थी रममाण झाले होते.

शनिवार दि. १६ मे रोजी बालशिबिराचा समारोप करण्यात आला. समारोपासाठी ग्रंथालयाचे संचालक, योगशिक्षक मा. श्री. प्रकाशजी दिसले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दीपप्रज्वलन व सरस्वतीपूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. सहसचिव सौ. अनुजाताई कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ग्रंथालयाचे अध्यक्ष मा. श्री. शरद इनामदार व सचिव मा. नंदकुमार कुलकर्णी उपस्थित होते. शिबिर शिक्षिका सौ. गर्भे, निवडक पालक व विद्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. श्री. दिसले यांनी योगाभ्यास, आदर्श दिनचर्या याविषयी माहिती दिली. तसेच योगासनांची प्रात्यक्षिके दाखविली. श्री. इनामदार यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रंथालय सेवक व संचालकांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

सर्व शिबिरार्थींना खाऊ वाटप करण्यात आला. सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. अशाप्रकारे बालशिबिर उत्साहात पार पडले.


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**





## वारकरी संप्रदायाचा अपमान केल्याबद्दल तीव्र निषेध, कारवाईची मागणी

वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकारांविषयी अपमानास्पद व धार्मिक भावना दुखावणारे वक्तव्य केल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) यांचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्याविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करावी यासाठी पश्चिम महाराष्ट्रात ५० हून अधिक ठिकाणी पोलिस स्टेशन मध्ये निवेदन देण्यात आले.

लवांडे यांनी सार्वजनिकरीत्या वारकरी संप्रदायातील २० जेष्ठ कीर्तनकारांवर घुसखोर व धर्मांध असे अत्यंत आक्षेपार्ह, अपमानास्पद व धार्मिक भावना दुखावणारे विधान केले. याचा सर्व वारकरी समाजातर्फे जाहीर निषेध करण्यात आला.

वारकरी संप्रदाय हा संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज अशा अनेक संतांच्या समतेच्या, भक्तीच्या व सामाजिक ऐक्याच्या विचारांवर आधारित शांतताप्रिय परंपरा आहे. अशा संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकारांविषयी अपमानास्पद विधान करणे हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे कृत्य आहे. सदर वक्तव्यामुळे वारकरी संप्रदायाच्या लाखो भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या, महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा व जेष्ठ कीर्तनकारांचा सार्वजनिक अपमान झाला, मानहानी झाली.

लवांडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करून सखोल चौकशी करण्यात यावी व कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी संपूर्ण महाराष्ट्रातून ठिकठिकाणी पोलिस स्टेशन मध्ये दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली. वारकरी संप्रदायातील शेकडो भाविक आणि विश्व हिंदू परिषद, बजरंग दलातील अनेक कार्यकर्ते यामध्ये सहभागी झाले.

## गोवंश संरक्षणासाठी महाराष्ट्र शासनाचे कठोर आदेश

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने दिनांक २१ मे २०२६ रोजी राज्यभर गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल आणि अनधिकृत कत्तलखान्यांविरोधात कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

गोतस्करी करणाऱ्यांवर कठोर कारवाई

अवैध कत्तलखाने शोधून बंद करण्याचे आदेश

वारंवार गुन्हे करणाऱ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई

संयुक्त तपासणी चौक्या व भरारी पथके स्थापन

डायल ११२ वर तक्रार होताच तात्काळ कारवाई

गोवंश संरक्षणासाठी शासनाने घेतलेले हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

सर्व हिंदू बांधवांनी जागरूक राहून प्रशासनाला सहकार्य करावे.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**





# मातृशक्ती अभ्यासवर्ग २०२६ : पश्चिम महाराष्ट्र प्रांत

पश्चिम महाराष्ट्र प्रांत मातृशक्ती अभ्यासवर्ग २०२६, गुरूवार १४ मे२०२६ ते रविवार १७ मे २०२६ या कालावधीत सातारा जिल्ह्यात बबनराव उथळे सभागृह शिवाजी उदय मंडळ मंगळवार पेठ या ठिकाणी घेण्यात आला. १४ मे रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत सर्व मातृशक्तींचे एकत्रीकरण करण्यात आले ७.३० वाजता उद्घाटन सत्र सुरू झाले.एकूण ५१ मातृशक्ती उपस्थित होत्या.

उद्घाटन सत्राच्या वेळी क्षेत्र संयोजिका डॉ. सौ. प्रतिभाताई बोथरे, प्रांत मंत्री मा. श्री किशोरजी चव्हाण, प्रांत सहमंत्री श्री नितीनजी वाटकर, प्रांत मंदिर अर्चक  पुरोहित आयाम प्रमुख श्री धनाजी शिंदे, छत्रपतींच्या वंशज वृषालीताई राजे भोसले, प्रांताचे माजी उपाध्यक्ष श्री बाबूजी नाटेकर तसेच विभाग आणि जिल्ह्याचे कार्यकर्ते उपस्थित होते.

उद्घाटनाच्या दिवशी प्रांत मातृशक्ती संयोजिका सौ.प्रियाताई रसाळ यांनी प्रास्ताविक सदर केले, प्रतिभाताईंनी मातृशक्तींना मार्गदर्शन केले तसेच छत्रपती संभाजी महाराजांची जयंती असल्याकारणाने किशोरजी चव्हाण यांनी महाराजांचे धर्माबद्दलचे कार्य आणि त्याग याची माहिती देऊन मार्गदर्शन करून उद्घाटन सत्र संपन्न झाले.

दुसऱ्या दिवसापासून पहाटे ५.३० वाजल्यापासून वर्गाच्या विविध सत्रांना प्रारंभ झाला. रोज सकाळी जागरण प्रातःस्मरण ,गीत अभ्यास, बौद्धिक सत्र, चर्चा गट घेण्यात आले तसेच स्वसंरक्षणासाठी महिलांना शारीरिक अभ्यासक्रमात शाखा लावणे,दंड, नियुद्ध, खेळ, शिकवण्यात आले.

बौद्धिक सत्रात डॉ. प्रतिभाताईंनी मातृशक्ती संघटन उद्देश, विश्व हिंदू परिषद स्थापना, तसेच केंद्रीय सहमंत्री मा .श्री गोविंदजी शेंडे यांनी हमारा गौरवशाली इतिहास, मा . श्री अनिरुद्ध जी पंडित यांनी हिंदू संस्कृती की विशेषता तसेच समारोप सत्रात केंद्रीय सहसंयोजिका मा.सौ. सरोजदीदी सोनी यांनी राष्ट्र चिंतन मे महिलाओं का सहभाग यांनी प्रबोधन केले.

मन स्वास्थ्य सुंदर रहावे म्हणून योग प्राणायामचे सत्र घेण्यात आले, याचे प्रशिक्षण शारदाताई रिकामे यांनी दिले. १५ आणि १६ मे रोजी बाल संस्कार वर्ग आणि सत्संग याचे प्रशिक्षण देऊन त्यांच्या कार्यशाळा देखील घेण्यात आल्या बालसंस्कार वर्गाचे प्रशिक्षण सुरेखाताई बल्लाळ तसेच सत्संगाचे प्रशिक्षण सौ रेवतीताई हनमसागर यांनी दिले. चर्चा गटांमध्ये छोटी छोटी सेवा कार्य, मातृशक्तीचे वार्षिक कार्यक्रम, संपर्क आणि प्रवास, पंचपरिवर्तन या विषयांवर चर्चा गट घेण्यात आले, सौ.आशाताई टेकवडे, सौ. शारदाताई रिकामे, सौ रेवतीताई हनमसागर,सौ सुरेखाताई बल्लाळ, सौ.अश्विनी ढेरे, सौ.प्रियाताई रसाळ , श्री अनिरुद्धजी पंडित, श्री धनाजी शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

प्रातःस्मरण सौ.अर्चनाताई रानडे, भोजन व्यवस्था सौ अरुणाताई माने, संगीताताई भोसले यांनी पार पडली तसेच बौद्धिक प्रमुख सुरेखाताई बल्लाळ होत्या आणि त्यांना सौ.अक्षता वांजळे यांनी सहकार्य केले .निधी आणि संपर्क विषयांमध्ये सौ निशाताई लोहार यांचे मोलाचे योगदान ठरले, मैदानातील खेळ, समता, शस्त्र शिकवण्यासाठी दुर्गवाहिनीच्या सौ. अस्मिताताई लाड यांनी सहकार्य

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

केले. सौ.मीराताई कुलकर्णी मुख्य शिक्षिका असून वर्गाची शिस्त,नियम तसेच सौ. वल्लरी खलाटे यांनी व्यवस्था खूपच छान पार पडल्या. सौ स्वातीताई चव्हाण यांनी कार्यालयीन व्यवस्था पार पाडली.

१६ मे रोजी सकाळी ६ वाजता महिलांची प्रभात फेरी काढण्यात आली. त्यात राजवाडा, दुर्गा मंदिर आणि ऐतिहासिक वास्तू याची भेट देऊन माहिती देण्यात आली भारत माता की जय! हिंदू धर्म की जय! अशा घोषणा देत महिलांनी उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले आणि पुढील कार्याला वेगळीच ऊर्जा मिळाली. अभ्यास वर्गात महिलांना प्रोत्साहन मिळावे म्हणून कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशज वृषालीताई राजे भोसले, सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर प्रियाताई शिंदे, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या अधिकारी सौ शुभांगी धुमाळ, डॉ. नीता सोहनी यांना सन्मानित करण्यात आले करण्यात आले. समारोपाच्या वेळी अनेक महिलांनी आपले मनोगत व्यक्त करून पुढील वाटचालीमध्ये मातृशक्तीचा कार्य विस्तार वाढवण्याचे दृष्टीने प्रयत्न करू आणि संस्कार वर्ग, सत्संग, सेवा या पैकी एक तरी कार्य उभे करू असा विश्वास व्यक्त केला. महाव्यवस्थापक श्री संतोषदादा शिंदे, जिल्हा मंत्री दीपकजी दिक्षित, जिल्हा अध्यक्ष श्री अतुलजी शालगार, श्री रवीजी ताथवडेकर, विभाग सहमंत्री विजयराव गाढवे, सौ. अश्विनी दिक्षित, विश्व हिंदू परिषदेच्या माजी कार्यकर्त्या आशाताई इनामदार, बजरंगी प्रसाददादा तिताडे, वेदांत आणि आर्या या सर्वांच्या मोलाच्या सहकार्याने १७ मे २०२६ रोजी भोजनानंतर अभ्यास वर्ग संपन्न झाला.





## कोकमठाण येथे विहिंपचा परिषद शिक्षा वर्गाचा समारोप

## गाव, पाडे, वस्तीमध्ये जाऊन हिंदुत्वाचे जागरण करा: रामुका

कोकमठाण/शिर्डी, दि. १३ मे : विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्र परिषद शिक्षा वर्ग (प.महाराष्ट्र आणि कोकण प्रांत) ३ मे ते १३ मे दरम्यान कोकमठाण येथील आत्मा मालिक ध्यानपीठ विश्वात्मक जंगली महाराज आश्रम, येथे पार पडला.

परिषद वर्ग समारोप कार्यक्रमास क्षेत्र मंत्री रामचंद्र रामुका (मुंबई), आत्मा मालिक ध्यानपीठाचे श्री. प.पू. परमानंदजी महाराज महाराज, प्रांत अध्यक्ष तथा, वर्ग प्रमुख प्रा. गजानन धरणे (सोलापूर), वर्ग पालक तथा समरसता क्षेत्र प्रमुख नरेश पाटील (मुंबई), क्षेत्र संघटन मंत्री अनिरुद्ध पंडित, प्रांतमंत्री किशोर चव्हाण, विहिंप केंद्रीय विश्वस्त प्रभाकरराव शिंदे, प्रांत विधि प्रकोष्ठ प्रमुख ॲड.शैलेश भावसार, प्रांत धर्मप्रसार प्रमुख तथा बौद्धिक प्रमुख ॲड. मृणालिनी पडवळ, वर्ग शारीरिक शिक्षा प्रमुख गजानन राणे, प्रांत निधी प्रमुख धनाजी शिंदे, प्रांत सेवा सहप्रमुख शर्वरी यरगट्टीकर, विभाग मंत्री विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री विशाल वाकचौरे इत्यादी उपस्थित होते.

या वर्गाचे आयोजन विहिंप, पश्चिम महाराष्ट्र प्रांत, उत्तर अहिल्यानगर जिल्हा यांनी केले होते. पश्चिम महाराष्ट्र प्रांत, कोकण प्रांत आणि गोवा येथून सर्व जिल्ह्यांतून शिक्षार्थी सहभागी झाले होते.

प्रारंभी भारतमाता व प्रभू श्री राम परिवार प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते झाले. सहभागी शिक्षार्थींनी अनुभव कथन झाले. त्यानंतर वर्ग प्रमुख तथा प्रांत अध्यक्ष प्राचार्य गजानन धरणे, वर्ग पालक तथा क्षेत्र समरसता आयाम प्रमुख नरेश पाटील यांनी शिक्षार्थींना संबोधन केले. परिषद शिक्षा वर्गात संपूर्ण देशभरातील

केन्द्रीय पदाधिकारी यात केन्द्रीय संघटन महामंत्री मा. मिलींद जी परांडे, मा. अंबरीशजी, मा.शंकरजी गायकर, मा.अजय निदलवार, मा.प्रा.अनंत पांडे, मा.अनिरुध्द पंडित, मा. विवेक कुलकर्णी, मा.प्रा. संजय मुदराळे, मा.मोहन सालेकर, मा.नरेश पाटील, मा.संजय ढवळीकर, मा.श्रीराज नायर, मा.दादा वेदक, मा.भाऊराव कुदळे, मा.किशोर चव्हाण, मा.ॲड.सतीश गोरडे, मा.नीतीन वाटकर, मा.ॲड.मृणालिनी पडवळ, मा.श्रीपाद रामदासी यांनी विविध विषयांवर शिक्षार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पहाटे साडेचार पासून रात्री साडेदहा पर्यंत दिनचर्या होती. पहाटे प्रातःस्मरण, शारीरिक, व्यायाम, योगा, विविध माहिती सत्र, कृती सत्र, चर्चासत्र, बौध्दिक, सत्संग व संवाद सत्र असे दिवसभराच्या कार्यक्रमात शिक्षार्थ्यांना प्रशिक्षण दिले. सर्वांचे अनुभव ज्ञान आणि संघटन कौशल्य याचा उपयोग कार्य विस्तारासाठी व्हावा, अशी संपूर्ण वर्गाची रचना होती. तसेच शिक्षार्थ्यांची ५० गुणांची लेखी परीक्षाही पार पडली. यासंदर्भात ही माहिती वर्गप्रमुख प्रा.गजानन धरणे यांनी समारोप्रसंगी अहवालाद्वारे दिली.

मुंबई क्षेत्रमंत्री श्री. रामचंद्रजी रामुका यांनी समारोपात शिक्षार्थ्यांना आपल्या राहत्या ठिकाणची माहिती घेणे आवश्यक असल्याचे सांगून कार्यकर्त्यांनी सर्वव्यापी सर्वस्पर्शी असे हिंदुत्वाचे कार्य करावे, असे आवाहन केले. आपल्या कामामध्ये डॉक्टर, वकील, व्यावसायिक सर्वांना सामावून घ्यावे. सामाजिक समरसता टिकवावी जेणेकरून महापुरुषांची जयंती, जन्मोत्सव समाजातील सर्वांनी एकत्रित साजरे करावे. वस्ती वस्तीमध्ये जाऊन हिंदुत्व जागरणाचे कार्यक्रम घ्यावेत. यावेळी त्यांनी श्री. माधवराव काणे (कल्याण नगरपालिकेचे तत्कालिन नगराध्यक्ष) यांचे उदा. दिले. श्री.काणे यांनी तळासरी येथे वसतिगृह आणि शाळा असे सेवा केंद्र सुरू केले आहे. त्यामुळे  धर्मांतरणास आळा बसला, मुले प्रशिक्षित होतात, सुसंस्कारित होतात, असे देखील उदाहरण श्री. रामुका यांनी दिले.श्री अशोकजी सिंघल यांनी राजस्थानमध्ये बांसवाडा क्षेत्रामध्ये एका वेळेस ७०,००० हिंदू बांधवांची घरवापसी केली, हे देखील मोठे कार्य आहे. मातृछाया प्रकल्प गोवा येथे देखील एक जनजातीय कल्याण केंद्र आहे. सेवा वस्तीमध्ये जाऊन संस्कार शाळा घेणे आणि समाजामध्ये सांस्कृतिक जागरण घडवावे, असे सांगितले.

आत्मा मालिक अध्यात्मिक ध्यानपीठ संत सद्गुरू श्री. परमानंदजी महाराज उपस्थितांना आशीर्वचन दिले. आत्मा मालिक ज्ञानपीठ विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने उपस्थित सर्व विश्व हिंदू परिषदेच्या कार्यकर्त्यांचे त्यांनी प्रारंभी अभिनंदन केले. येत्या काळात हिंदुत्वासाठी समाजामध्ये जाऊन काम करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्व दूर हिंदुत्वाचे कार्य घडावे, यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दहा दिवसाचे भोजन, निवास सेवा आत्मा मालिक ध्यानपीठ, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम येथे देण्यामध्ये आमची धन्यता आहे. असे गौरवोद्गार त्यांनी काढले. आत्मा मालिक ध्यानपीठ, विश्वात्मक जंगली महाराज ट्रस्ट मार्फत प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, महाविद्यालय आणि वसतिगृह चालविले जाते. विद्यार्थ्यांना संस्कारीत आणि सक्षम नागरिक करण्यासाठी ही मुले,मुली पुढच्या पिढीचे भविष्य आहे आणि ते उज्वल व्हावे म्हणून आपण प्रयत्न करतो असे स्वामीजींनी सांगितले. येत्या काळामध्ये हिंदुत्वाचे जागरण होवो आणि सर्व समस्या निराकरण होवो असे आपल्या हातून कार्य घडावे अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

या प्रशिक्षण कालावधीत १२ मे रोजी संध्याकाळी आहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण ८ गावांमध्ये जाऊन शिक्षार्थ्यांनी सत्संग, सेवाकार्य केले. परिषद वर्गात शिक्षार्थ्यांसाठी हा आगळा वेगळा अनुभव होता. समारोप सत्र कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग मंत्री विजयकुमार पिसे यांनी केले. वर्गाची व्यवस्था प्रांत सहमंत्री तथा पालक ॲड सतिश गोरडे, व विधी प्रक़ोष्ठ प्रमुख ॲड.शैलेश भावसार यांच्या मार्गदर्शनाखाली महाव्यवस्था प्रमुख विभाग सहमंत्री विशाल वाकचौरे, जिल्हा मंत्री सुरेंद्र महाले यांच्या नेतृत्वात योगेश मखाना, तुषार ठाकूर, दीपक शिनगर, शुभम मुर्तडक, राकेश भोकरे, प्रशांत बहिरट, मुकेश दायमा, दीपक भोसले, गीता परदेशी, आशा महाले, ज्ञानेश्वरी ठाकूर आदि कार्यकर्त्यांनी केली.

**वृत्त संकलन : विजयकुमार पिसे,**

**(कोकमठाण विहिंप परिषद शिक्षा वर्ग चर्चासत्र प्रवर्तक)**


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अमंलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शक

**प्रस्तावना** : भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४८ मधील तरतुदीनुसार गाी व वासरे, तसेच इतर दुभती जनावरे यांच्या जातींचे जतन करणे आणि त्यांच्या जाती सुधारणे, उपयुक्त जनावरांची (विशेषतः गाई व वासरे) कत्तल रोखण्यासाठी योग्य ती पावले उचलणे किंवा कायदे करणे यासाठी शासनाने प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तसेच, राज्य शासनास विविध संघटनांकडून गो तस्करी, गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखाने इ. बाबत उचित कारवाई करण्याबाबत निवेदने प्राप्त झाली आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होत असल्याने भारतीय संविधानातील तरतूद आणि शासनाच्या विविध कायदे व नियमांच्या अनुषंगाने गोवंशाचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक** : वर प्रस्तावनेमध्ये नमूद विवेचनास अनुलक्षून गोवंशाची अवैध वाहतूक, अवैध कत्तल, अनधिकृत कत्तलखाने यांना प्रतिबंध करणे तसेच संबंधित कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, १९६० तसेच इतर आनुषंगिक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी.

२. संबंधित सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका/ नगर पंचायती तसेच, सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती व ग्राम पंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने शोधून त्यांच्यावर नियमोचित कारवाई करावी. तसेच, कोणत्याही क्षेत्रात अनधिकृत तथा विनापरवाना कत्तलखाने असणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. प्रचलित असलेले कायदे व नियम यांचा भंग करून वारंवार संघटित पद्धतीने गोतस्करी करणाऱ्या व्यक्ती, टोळ्या अथवा संघटनांविरूद्ध संबंधित पोलीस यंत्रणेने प्रचिलत नियमानुसार तपास करून महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण अधिनियम (मकोका) अंतर्गत नियमोचित कारवाई करावी.

४. राज्यातील परिवहन/वाहतूक विभागाने उपरोक्त प्रमाणे अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करून संबंधित वाहनांवर मोटार वाहन अधिनियम व इतर आनुषंगिक कायद्यांनुसार नियमोचित कारवाई करावी.

५. राज्यातील सर्व पोलीस अधिक्षक कार्यालये, पोलिस आयुक्तालये त्याचप्रमाणे पशुसंवर्धन आयुक्तालय व परिवहन आयुक्तालय यांनी आपल्या स्तरावरून स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करावेत. नियुक्त अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक सर्व संबंधित विभागांना आणि नागरिकांना उपलब्ध करून द्यावेत.

६. महाराष्ट्र राज्याच्या सीमावर्ती भागातील प्रत्येक जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील पोलीस यंत्रणा, परिवहन कार्यालये, नागरी/ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था, पशुसंवर्धन कार्यालये या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेली सीमा भागावर इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यामध्ये प्रवेशाच्या ठिकाणी संयुक्त तपासणी चौकी स्थापन करावी.

७. राज्यातील सर्व संबंधित विभागांनी संयुक्त भरारी पथके स्थापन करून अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखाने यांवर नियमोचित कारवाई करण्यात यावी.

८. गोवंशाचे जतन व संवर्धन प्रभावीपणे करण्यासाठी डायल ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर गो तस्करी, गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखाने या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित पोलीस यंत्रणेने उक्त तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी.

९. मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ चे कलम ४०३(२) अन्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून धार्मिक कारणास्तव तात्पुरते पशुवधगृह स्थापन करण्यास लेखी परवानगी दिल्यानंतर पशुवधगृहाची स्वच्छता ठेवणे, जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन करणे, सार्वजनिक आरोग्य व सुरक्षिततेसंबंधी सर्व नियमांचे काटेकोर पालन करणे परवानाधारकांवर बंधनकारक राहील.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलीस आयुक्तालय क्षेत्र वगळून इतर ठिकाणी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच पोलीस आयुक्तालय क्षेत्रात संबंधित पोलीस आयुक्त यांची राहील. संबंधित जिल्हाधिकारी व पोलीस आयुक्त यांनी उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने नियमित आढावा घ्यावा व सदर सूचनांची काटोकोरपणे अमंलबजावणी करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२६०५२११४३२२७५९२९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांतिक करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार जावळे, उपसचिव, महाराष्ट्र शासन**





# संघटन महामंत्री मिलींद परांडे यांचा अनेक मान्यवरांशी संवाद, ग्रामदैवत सिध्दरामेश्वर मंदिरास भेट व दर्शन

सोलापूर : विश्व हिंदू परिषदेचे देशभरात सर्वत्र व्यापक जनसंपर्कासाठी दर तीन वर्षांनी होणारे हितचिंतक नोंदणी अभियान नजीकच्या काळात होत असून सर्व कार्यकर्त्यांनी हे अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन विहिंपचे केंद्रीय संघटन महामंत्री मिलींद जी परांडे यांनी सोलापुरात केले.

लातूर येथे विहिंपच्या संघटनात्मक प्रवासानिमित्त श्री.परांडे यांचे सोलापुरातील अंत्रोळीकर नगर भागात विहिंपचे जिल्हा अध्यक्ष विष्णू मोंढे यांच्या निवासस्थानी काही काळ वास्तव्य होते. यावेळी अनेक मान्यवरांनी त्यांची भेट घेतली. या भेटीत संवाद, परिचय आणि चर्चा झाली. हिंदू धर्माचा गौरवशाली इतिहास, विश्व हिंदू परिषदेची स्थापना व कार्यपद्धती याविषयी त्यांनी माहिती दिली.

हिंदू समाजात सक्षम व संस्कारित व्यावसायिक निर्माण करण्याची आवश्यकता असून, कुटुंब प्रबोधन, हिंदू समाजाच्या लोकसंख्येत घट, लँड जिहाद, हिंदू अस्मिता व धर्मरक्षणासाठी प्रत्येकाने सक्रियपणे व समर्पित भावनेने धर्मकार्यात सहभागी होण्याची गरज याविषयी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

हिंदू समाजात व्यापक संपर्क, संवादासाठी दर तीन वर्षांनी विहिंपचे हितचिंतक नोंदणी अभियान होते. यंदा नजीकच्या काळात हे अभियान होणार असून यासंदर्भात केंद्र व प्रांत स्तरावरून मार्गदर्शकपर माहिती तसेच कालावधी व या उपक्रमाची माहिती येईल, तेव्हा विहिंप कार्यकर्त्यांनी हितचिंतक अभियान अधिक प्रभावीपणे राबवावे आणि ग्राम पातळीपर्यंत संघटनेचा व्यापक विस्तार करावा, असे आवाहन परांडे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधताना केले. सामाजिक समरसता, संघटन विस्तार, सेवा कार्य, युवक सहभाग व आगामी उपक्रमांच्या अनुषंगानेही त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले, अशी माहिती विहिंपचे विभाग मंत्री विजयकुमार पिसे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

दरम्यान ग्रामदैवत श्रीसिद्धरामेश्वर मंदिरास श्री. परांडे यांनी भेट देऊन दर्शन घेतले. मंदिर परिसर पाहणीत सुवर्ण सिध्देश्वर प्रकल्प बांधकाम व अन्य उपक्रमांची माहिती घेतली. तसेच मंदिराचे वतीने सुरू असलेले धार्मिक, सामाजिक व सेवा उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. श्री.परांडे यांच्या भेटीप्रसंगी देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी संस्थेच्या धार्मिक, सामाजिक, वैद्यकीय व शैक्षणिक कार्य, संस्कृत वैदिक शाळा, श्री सिद्धेश्वर अध्ययन केंद्र व ग्रंथालयाविषयी श्री. परांडे यांना अवगत केले.

या भेटीदरम्यान देवस्थान समितीचे वतीने मिलींद परांडे यांचा अध्यक्ष काडादी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पंचकमिटीचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, विश्वस्त नीलकंठप्पा कोनापुरे, बाळासाहेब भोगडे, गिरीश गोरनळ्ळी, पशुपतीनाथ माशाळ, विलास कारभारी, प्रकाश बिराजदार, रतन रिक्के, प्रभुराज मैंदर्गीकर, सिध्देश्वर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज काडादी, शरणराज काडादी, तसेच विहिंपचे कर्नाटक प्रांत अध्यक्ष लिंगराज अप्पा, धर्माचार्य प्रांत सहसंपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, जिल्हा अध्यक्ष विष्णू मोंढे, उपाध्यक्ष ॲड.केदार पाटील, जिल्हा मंत्री जयदेव सुरवसे, सहमंत्री बापू कदम, बाबू गिरगल, विभाग सहमंत्री संजयकुमार जमादार, बजरंग दल संयोजक अभय कुलथे, अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# चांगल्या बातम्या

१) ३ मे रोजी बंगळुरू मधील अंतराळ स्टार्ट अप कंपनी, गॅलेक्सी आय चा दृष्टी नावाचा उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित झाला. दृष्टी हा इलेक्ट्रो ऑप्टिकल (ईओ) आणि सिंथेटिक अपर्चर रडार (एसएआर) हे दोन्ही ही एकत्र काम करणारा जगातील पहिला उपग्रह आहे. ईओ हे सूर्यप्रकाश आणि स्वच्छ आकाशात उच्च रिझोल्युशन प्रतिमा घेतात. तर एसएआर सेन्सर्स सर्व हवामानात, ढगाळ तसेच रात्रीच्या वेळी ही, प्रतिमा घेतात. जगातील आतापर्यंतचे उपग्रह हे इओ किंवा एसएआर यापैकी एकच यंत्रणा असलेले होते.

या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचा उपयोग संरक्षण, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सागरी देखरेख, पायाभूत सुविधांचे नियोजन वगैरे साठी करता येईल.

२०३० पर्यंत गॅलेक्सी कंपनी असे १० उपग्रह प्रक्षेपित करणार आहे. इस्रोने जाहीर केले आहे की भारताचे पृथ्वी निरीक्षण करणारे एकूण २९ उपग्रह असतील.

२) जून २०२० मध्ये सरकारने अवकाश क्षेत्र खाजगी कंपन्यांना खुले केल्यानंतर मार्च २६ पर्यंत अवकाश क्षेत्रात काम करणारे जवळपास ४०० भारतीय स्टार्टअप आहेत. IN-SPACEe ही संस्था या सर्व स्टार्टअप ना इस्रोशी जोडते. त्यांना लागणारे तंत्रज्ञान, माहिती, चाचण्या वगैरे गोष्टी साठी इस्रो मदत करते. या स्टार्टअप मध्ये प्रामुख्याने खालील कंपन्या उल्लेखनीय आहेत. स्काय रूट एरोस्पेस ही पहिली युनिकॉन स्टार्टअप कंपनी असून त्यांनी अवकाशात त्यांचा पहिला अग्निबाण यशस्वीपणे प्रक्षेपित केला. लवकरच ते पृथ्वीच्या कक्षेत उपग्रह सोडणारा अग्निबाण प्रक्षेपित करणार आहेत.

अग्नीकुल कॉसमॉस यांनी जगात प्रथमच ३ डी प्रिंटेड इंजिन बनवले व त्या इंजिनन‌ी अग्निबाण प्रक्षेपित केला.

ध्रुव स्पेस हे छोटे उपग्रह बनवत आहेत. गॅलेक्सी आणि पिक्सेल हे पृथ्वी निरीक्षण करणारे उपग्रह बनवत आहेत.

याशिवाय बेलाट्रिक्स एरोस्पेस, मनत्सुस्पेस, इन्स्पेसिटी, दिगंतारा वगैरे ड्व्हान्स इंजिन ऑरबिटल सर्विसेस वगैरे गोष्टींमध्ये काम करत आहेत. खाजगी कंपन्यांची कामगिरी आतापर्यंत खाजगी कंपन्यांनी बनवलेली २५ पेलोड ही पीएस्एल्व्ही अग्निबाणाने, अवकाश कक्षेत गेली आहेत किंवा जाण्यास तयार आहेत. ६ खाजगी कंपन्यांचे १८ उपग्रह अवकाशात प्रक्षेपित झाले आहेत. २५ खाजगी कंपन्यांचे उपग्रह किंवा अन्य सिस्टीम ची अंतिम चाचणी सुरू आहे.

केंद्र सरकारने मान्यता प्राप्त स्टार्टअप ना बीज भांडवल पुरवले असून एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व स्टार्टअप ची माहिती उपलब्ध करून दिली आहे. ती स्वारस्य असलेल्या गुंतवणूकदारांना पाहता येते, व कोठे गुंतवणूक करायची ते ठरवता येते. आतापर्यंत ६३,१०० कोटी डॉलर्स (५९ लाख ३१ हजार कोटी रुपये) ची गुंतवणूक या भारतीय स्टार्टअप मध्ये झाली आहे.

जागतिक अंतरिक्ष बाजारातील भारताचा २०२५ अखेरचा वाटा फक्त २% आहे. म्हणजे ८.४ बिलियन डॉलर (७९,००० कोटी रुपये). २०३० पर्यंत भारताने आपला वाटा जागतिक अंतरिक्ष बाजारात ८% म्हणजे ४४ ते ५० बिलियन डॉलर (४ लाख १८ हजार कोटी रुपये) पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

४) १९ एप्रिल रोजी केंद्रीय मंत्री श्री वैष्णव यांच्या हस्ते भारतातील पहिल्या ३डी ग्लास चिप पॅकेजिंग युनिटची ओरिसा मध्ये पायाभरणी झाली. १९४३ कोटी रुपयांची गुंतवणूक करून अमेरिकेची ३डी ग्लास कंपनी त्यांच्या मालकिच्या भारतीय हिटरोजिनस इंटिग्रेशन पॅकेजिंग कंपनी मार्फत दरवर्षी ५ कोटी प्रगत असेम्ब्ल्ड युनिट्स व ७०,००० ग्लास पॅनेल्स तेथे बनवणार आहेत. या असेंम्बल्ड युनिट चा उपयोग अनेक महत्त्वाच्या क्षेत्रात, जसे संरक्षण, अंतराळ, AI, 5G, डाटा सेंटर वगैरे, होणार आहे. या कारखान्यात असेंम्बल्ड युनिट चे उत्पादन ऑगस्ट २८ मध्ये सुरू होईल. आणि ऑगस्ट २०३० पर्यंत पूर्ण क्षमतेने उत्पादन सुरू होईल.

**कुमार आठवले**

◈ ◈ ◈

# ॥ श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ॥

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि;
# श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^{2}$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

श्री. महेश संभाजीराव करपे
श्री. हेमंत संभाजीराव करंजे
श्री. योगेश दत्तात्रय ससाणे
श्री. अनिल जयवंतराव भुजबळ
श्री. किसन दिनकर शिंदे
श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम
श्री. अनिल लक्ष्मण बधे
श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे
श्री. माधव पांडुरंग राऊत
सौ. लता सतिष केंढे
श्री. हनुमंत बबन शिवले
श्री. भगवान दशरथ मेमाणे

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# अधिक मास : अध्यात्माचा पवित्र काळ!

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सण, व्रत आणि कालखंडाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. अशाच काही कालखंडांपैकी एक म्हणजे अधिक मास! हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जाणारा महिना आहे.

अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' असेही म्हणतात. हा महिना साधारणतः दर तीन वर्षांनी एकदा येतो. या महिन्यात लोक भक्तिभावाने जप-तप करतात, विष्णू पूजनाला महत्त्व असल्याने सत्यनारायण पूजेला विशेष महत्त्व असते. हा कालखंड पवित्र मानला जातो त्यामुळे यात दानधर्म देखील अधिक प्रमाणात केला जातो. अधिक मास हा केवळ धार्मिक परंपरा नसून आत्मशुद्धी आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी एक संधी मानली जाते.

खगोलशास्त्रानुसार हिंदू पंचांग हे चंद्राच्या गतीवर आधारित आहे, तर इंग्रजी कालगणना सूर्याच्या गतीवर आधारित असते. चांद्र वर्ष आणि सौर वर्ष यांच्यात साधारण अकरा दिवसांचा फरक पडतो. मग तसे पाहता ऋतू आणि पंचांग यांचा हा फरक भरून काढण्यासाठी दर दोन वर्षे आठ महिने किंवा साधारण तीन वर्षांनी एक अतिरिक्त महिना जोडला जातो. हाच अतिरिक्त महिना म्हणजे अधिक मास!

पौराणिक काळापासून, प्रत्येक महिना/ वार यांचा एक स्वामी किंवा देवता पूजनीय मानली जाते. अधिक मासात सूर्याचे संक्रमण होत नसल्याने पूर्वी अधिक मासाला मलमास असेही म्हटले जाऊन अपवित्र महिना म्हणून त्यास हिणवले जात असे.म्हणून या महिन्यात विवाह, मुंज, गृहप्रवेश यांसारखी शुभ कार्ये सुद्धा निषिद्ध मानली जात.कोणतीही देवता या महिन्याचे स्वामित्व स्वीकारण्यास तयार नव्हते. तेव्हा अधिक मास दुःखी होऊन वैकुंठात भगवान श्री विष्णूंकडे गेला. तेव्हा भगवान विष्णूंनी त्याला अभय दिले आणि स्वतःचे पुरुषोत्तम असे नाव त्यास बहाल केले. तसेच भगवंतांनी वरदान दिले की, जो कोणी या महिन्यात माझी भक्ती करेल, दानधर्म करेल त्याला अनेक पटींनी अधिक पुण्य मिळेल.

अधिक मासात धार्मिक कार्यांना विशेष महत्त्व दिले जाते. या काळात लोक मंदिरात जाऊन पूजा-अर्चा करतात, जप, नामस्मरण, भागवत वाचन, रामायण आणि गीतेचे पठण करतात. काही लोक उपवास करतात तर काहीजण दानधर्म करून गरजूंना मदत करतात. असे मानले जाते की या महिन्यात केलेल्या पुण्यकर्माचे फळ अनेक पटींनी मिळते.अधिक मास हा आत्मपरीक्षणाचा आणि मनशुद्धीचा काळ मानला जातो. आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस सतत भौतिक सुखांच्या मागे धावत असतो. अशा वेळी अधिक मास आपल्याला थोड थांबून स्वतःकडे पाहण्याची संधी देतो. मनातील वाईट विचार, मत्सर, राग आणि अहंकार दूर करून चांगल्या विचारांकडे वळण्याचा संदेश हा महिना देतो.

अधिक महिन्यात दान करण्याची परंपरा विशेष मानली जाते. यात काही दानांना विशेष महत्व प्राप्त आहे. जसे की,

१) दीपदान: या महिन्यात अखंड दीप प्रज्वलित ठेवणे किंवा ब्राह्मणाला दीपदान करणे अत्यंत शुभ मानले जाते.

२) धोंड्याचे वाण: महाराष्ट्रात या महिन्यात लेक-जावयाला घरी बोलावून ३३ अनारशांचे (धोंड्यांचे) वाण देण्याची विशेष परंपरा आहे.

३) बत्ताशाचे वाण: ज्यांना परिस्थितीमुळे शक्य नसल्यास त्यांनी बत्ताशाचे वाण करावे.

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

४) अन्नदान, वस्त्रदान, गोधन, धार्मिक ग्रंथांचे वितरण अशा अनेक प्रकारे देखील दान लोक समाजसेवा म्हणून करतात. असे दान केल्याने समाजातील गरजू लोकांना मदत होते.

या महिन्यात पोथी वाचन पवित्र मानले जाते. जसे 'पुरुषोत्तम माहात्म्य' किंवा 'अधिक मास माहात्म्य' या पोथीचे ३० दिवस वाचन केले जाते. तसेच विष्णू सहस्रनाम पठण, सत्यनारायण कथा आणि श्रीमद्भगवद्गीता वाचन करणे फलदायी ठरते. यामुळे समाजात सहकार्य व मानवतेची भावना वाढीस लागते. त्यामुळे अधिक मासाचा सामाजिक दृष्ट्याही मोठा उपयोग आहे.

अधिक मास संपूर्ण भारतभर पाळला जातो, परंतु ज्या राज्यांमध्ये चांद्र पंचांग वापरले जाते, तिथेच तो प्रामुख्याने दिसून येतो.जसे की महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये हिंदू पंचांग चंद्राच्या गतीवर आधारित आहे.या राज्यांमध्ये अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' म्हणून मोठे धार्मिक महत्त्व आहे. महाराष्ट्र राज्यात 'धोंड्याचा महिना' म्हणून जावयाला ३३ अनारसे देण्याची मोठी परंपरा आहे.उत्तर भारतात उत्तर प्रदेश मध्ये विशेषतः मथुरा–वृंदावन , राजस्थान आणि मध्य प्रदेशात या काळात मोठी यात्रा आणि विशेष विष्णू पूजा आयोजित केली जाते. तर पश्चिम बंगाल, ओडिशा, तामिळनाडू, आसाम आणि केरळ या राज्यांमध्ये सौर पंचांग पाळले जाते. सौर पंचांग सूर्याच्या राशी संक्रमणावर आधारित असल्याने तिथे कॅलेंडरमध्ये मअतिरिक्त महिनाफ(अधिक मास) येत नाही.मात्र, पश्चिम बंगाल सारखी काही राज्ये विष्णू भक्त किंवा धार्मिक संस्था आध्यात्मिक दृष्टीने या काळाचे महत्त्व मान्य करतात.

आजच्या आधुनिक काळात काही लोक धार्मिक परंपरांकडे अंधश्रद्धेने पाहतात, तर काहीजण त्यामागील तत्त्वज्ञान समजून घेत नाहीत. परंतु अधिक मासाचा खरा अर्थ केवळ पूजा किंवा उपवास यात नसून आत्मशुद्धी, संयम, सकारात्मक विचार




आणि समाजसेवा यात आहे. जर प्रत्येकाने या महिन्यात एखादी चांगली सवय लावली, वाईट सवय सोडली किंवा एखाद्या गरजू व्यक्तीला मदत केली, तर त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम होऊ शकतो.

अधिक मास आपल्याला श्रद्धा, संस्कार आणि अध्यात्म यांची आठवण करून देतो. हा महिना केवळ धार्मिक विधी करण्यासाठी नसून मनाला शांतता देण्यासाठी आणि चांगले जीवन जगण्याची प्रेरणा देण्यासाठी आहे. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आजही लोकांच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे अधिक मासाचे महत्त्व केवळ धार्मिक नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि मानसिक दृष्ट्याही अत्यंत मौल्यवान आहे.

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता वेल्फेअर सोसायटी**

# विमानछत विच्छेदन प्रणाली

काशीनाथ देवधर हे संरक्षण संशोधन व विकास संघटन (डीआरडीओ) मधील वरिष्ठ वैज्ञानिक आहेत आणि आर्मामेंट रिसर्च मधून ग्रुप डायरेक्टर म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत.

स्वदेशी तेजस लढाऊ विमान व तेजस शिकाऊ विमान या भारतीय हवाई दला साठी विमानांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन बेंगलूर येथे हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड द्वारा सुरु असून त्या विमानाची विमानछत विच्छेदन प्रणाली ही संपूर्णरित्या स्वदेशी तंत्रज्ञान वापरून विकसित करण्यात मला सहभागी होता आले आणि त्या गटाचे नेतृत्व करून तंत्रज्ञान हस्तांतरण केल्याबद्दल आत्मनिर्भर भारतासाठी चे योगदान म्हणून पिनाक पुरस्कार ने सन्मानित केल्या बद्दल मला धन्य वाटत आहे.

नुकतीच दि २ डिसेंबर २०२५ रोजी DRDO ने ८०० किमी प्रति तास या वेगाने जात असताना चंदिगड येथे वैमानिक निर्गमन प्रणाली (Emergency Escape System) याची कार्यान्वयन चाचणी प्रथमच ही सुविधा तयार केली आणि यशस्वी पणे घेऊन भारत अशी सुविधा असणाऱ्या मोजक्या देशांच्या रांगेत जाऊन बसला. आधी अशी चाचणी करण्यासाठी रशिया, इंग्लंड यासारख्या देशांची मदत घ्यावी लागत होती, तेथे जाऊन ती चाचणी करण्यात येत असे. कोणत्याही आणीबाणी प्रसंगी वैमानिक निर्गमन प्रणाली (Emergency Escape System) चे कार्यान्वयन योग्य आहे की नाही हे आपल्या देशात पहाता येत नव्हते. केवळ ०-०-चाचणी म्हणजे शून्य मीटर उंची आणि शून्य मीटर प्रति सेकंद वेग अशीच चाचणी इथे होत होती. चंदिगड येथील ही चाचणी प्रत्यक्ष ८०० किमी प्रतितास वेगात असताना कार्यान्वयन चाचणी करण्याची सुविधा असणे हा समर्थ भारताच्या विकासातील मैलाचा दगड आहे हे निश्चित. आणि प्रत्यक्षामध्ये माझी विमानाछत विच्छेदन प्रणाली अशा चाचणी मध्ये यशस्वी पणे कार्यान्वयित झाली याचा सार्थ अभिमान व धन्यता वाटत आहे.


हवाई दलाचा अत्यंत महत्त्वाचा मोहरा म्हणजे एक प्रशिक्षित आणि कुशल वैमानिक. त्याच्या लढाऊ विमानाला अपघात झाला किंवा आणीबाणीची परिस्थिती उद्भवली, तर त्याला त्याच्या खुर्चीसकट विमानातून सुखरूप बाहेर काढण्यासाठी अत्यंत कमी वेळात विमानछत तोडावे लागते. संपूर्ण भारतीय बनावटीच्या मतेजसफ लढाऊ विमानातील या यंत्रणेची माहिती या लेखात सादर केली आहे.

भारतीय बनावटीचे ‘तेजस’ हे हलक्या वजनाचे लढाऊ विमान (लाईट कॉम्बॅट एअरक्राफ्ट- एलसीए) भारतीय हवाई दलाच्या एका महत्त्वाच्या तुकडीचे मुख्य घटक झाले आहे. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) या सार्वजनिक संरक्षण उद्योगाला ८३ तेजस विमाने बनवून देण्याचा कार्य-आदेश मिळाला असून छत्तीस विमाने दोन स्वाड्रन मधे भारतीय वायुदलाच्या सेवेत आहेत. मआत्मनिर्भर भारत अभियानफअंतर्गत ही संरक्षण मंत्रालयाची मोठी भरारी आहे.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन- डीआरडीओ) आणि वैमानिकी विकास संस्था (एॅनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सी- एडीए) यांच्याद्वारा या लढाऊ विमानाचे डॉ. कोटा हरिनारायण यांच्या नेतृत्वात अभिकल्यन व विकास (डिझाईन अँड डेव्हलपमेंट) कार्य करून, त्याच्या सर्व प्रकारच्या उड्डाण प्रमाणापत्रासाठीच्या

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**




चाचण्या यशस्वी केल्या गेल्या. ४ जानेवारी २००१ मध्ये मा. पंतप्रधान अटलजींच्या हस्ते राष्ट्रार्पण करून, या विमानाचे मतेजसफ असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर उर्वरित आवश्यक त्या चाचण्या यशस्वी झाल्यानंतर, 'तेजस' विमानांचे नियमित उत्पादन 'एचएएल'च्या बेंगलुरू येथील कारखान्यात सुरु झाले असून, सध्या वर्षाला बारा विमाने या वेगाने उत्पादन सुरु आहे; व येत्या काही वर्षांमध्ये वर्षाला पन्नासचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यासाठी आवश्यक साधनसामग्री व पायाभूत सुविधा निर्माण करणे सुरू आहे. यासाठी २०१४ नंतर तत्कालीन रक्षा मंत्री श्री मनोहर पर्रीकर यांच्या आदेशानुसार भारत सरकार मोठ्या प्रमाणावर मदत करत आहे. स्वदेशी बनावटीच्या 'तेजस' लढाऊ विमानांची निर्मिती अव्याहतपणे करून, भारतीय हवाई दलाच्या गरजा निश्चितच पूर्ण होतील हे नक्की!

'तेजस' विमानासाठी अत्यंत महत्त्वाची व अत्यावश्यक असणारी जीवरक्षक यंत्रणा म्हणजे खुर्चीसह वैमानिक निर्गमन प्रणाली (सीट इजेक्शन सिस्टिम). विमान जमिनीवर उभे असताना, जमिनीवर अथवा हवेमध्ये मार्गक्रमण करताना, निर्माण झालेल्या आणीबाणीच्या स्थितीमध्ये वैमानिकांचा प्राण वाचवणारी ही यंत्रणा आहे. याचीच पहिली क्रिया म्हणजे, वैमानिकाचे शिरस्त्राण विमानाच्या पारदर्शक काचेसम असणाऱ्या छताला धडकायच्या आतच हे छत मोकळे करून, किंवा छत तोडून टाकून, वैमानिकास बाहेर फेकणारा मार्ग सुरिक्षत करणे. असा सुरक्षित मार्ग निश्चित करण्यासाठी 'विमानछत विच्छेदन प्रणाली' (कॅनॉपी सेव्हरन्स सिस्टम – सीएसएस) ही अत्यंत आवश्यक व अनिवार्य असणारी यंत्रणा शतप्रतिशत भारतीय तंत्रज्ञानाने बनविण्याचे अभूतपूर्व काम आयुध संशोधन आणि विकास संस्था (आर्मामेंट रिसर्च अँड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट – एआरडीई) आणि उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोगशाळा (हाय एनर्जी मटेरीयल्स रिसर्च लॅबोरेटरी – एचईएमआरएल) या दोन्ही पुणेस्थित संस्थांनी मिळून केले आहे. सुरुवातीस मर्यादित संख्येचीच निकड असल्याने या संस्थांनीच अंतर्गत उत्पादन करून पुरवठा केला. त्याचबरोबर, माझ्याच नेतृत्वात हैदराबादस्थित खाजगी उद्योगास हे अत्याधुनिक तंत्रज्ञान सुपुर्द करून, त्यांना उत्पादनक्षम बनविले. त्यासाठीच आम्हाला आत्मनिर्भर भारत चा अत्यंत महत्वपूर्ण व सन्मानाचा पिनाक पुरस्कार मिळाला. नियमित उत्पादनक्षम व उड्डाणयोग्य गुणवत्ता असणाऱ्या विमानछत विच्छेदन यंत्रणेची खाजगी उद्योगाकडून निर्मिती करून पुरवठा केला जाईल. हेच अद्ययावत व अत्याधुनिक तंत्रज्ञान एचजेटी–३६ आणि एचटीटी–४० या दोन्ही भारतीय प्रशिक्षण विमानांसाठीही वापरले जाणार आहे.

विमानछत विच्छेदन प्रणालीचे अत्याधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञान एआरडीई आणि एचईएमआरएल या दोन डीआरडीओच्या संस्थांनी एकत्र संशोधन करून, संपूर्णपणे भारतात विकसित केले आहे. या सीएसएस–अंतर्गत दोन स्वतंत्र प्रणाली विकसित केल्या आहेत; मात्र त्यासाठीचे तंत्रज्ञान एकच आहे.

१) उड्डाणांतर्गत निर्गमन प्रणाली (इनफ्लाईट एग्रेस सिस्टम आयईएस) ही विमान उड्डाण करीत असताना किंवा हवेतून मार्गक्रमण करीत असताना, निर्माण झालेल्या आणिबाणीच्या परिस्थितीत वैमानिक जेव्हा बाहेर पडण्याचा निर्णय घेऊन, 'खुर्चीसह निर्गमन प्रणाली'ची कळ दाबून आदेश देतो; तेव्हा

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

त्यापुढील सर्व क्रिया क्रमाक्रमाने स्वयंचलित पद्धतीने होतात. खुर्ची बाहेर फेकण्यासाठी लागणारी ऊर्जा मशक्ती काडतूसफ (पॉवर कार्दिज) मालिकेद्वारा मिळते. काडतूस कार्यान्वित (फायर) होऊन स्फोटकांमध्ये साठविलेली रासायनिक ऊर्जा उत्सर्जित होते; आणि एकदम उच्च दाब व तापमान असणारे वायू तयार होतात. या वायूंचा उपयोग पुढील सर्व यांत्रिक घटना व हालचालींसाठी केला जातो. पहिले मुख्य काडतूस फायर झाल्यावर त्यातील वायूंचा काही अंश घेऊन, आयईएस प्रणालीतील प्रस्फोटकाचा प्रस्फोट होऊन, ही प्रणाली कार्यान्वित होते.

२) भूतल निर्गमन प्रणाली (ग्राऊंड एग्रेस सिस्टम जीईएस) ही प्रणाली कार्यान्वयित करण्यासाठी, त्यामध्ये आतून प्रस्फोट करणारी यंत्रणा व बाहेरून दोन्ही बाजूस प्रस्फोट करणारी यंत्रणा, अशा तीन यंत्रणांची रचना केलेली असते. या तिन्हींपैकी कोणत्याही एका यंत्रणेद्वारा प्रस्फोटकाचा स्फोट करून, जीईएस कार्यान्वयित केली जाते.

जीईएस ही यंत्रणा विमान जमिनीवरच असताना उड्डाणापूर्वी, अथवा विमान उड्डाण करून परत आल्यानंतर जमिनीवर उतरवल्यावर (धावपट्टीवर अथवा सहमार्गिकेवर), निर्माण झालेल्या आणीबाणीच्या स्थितीत म्हणजे कोसळण्याच्या परिस्थितीत (कॅश लैडिंग) उपयोगी पडते. वैमानिक स्वतः आतून अथवा विमानतळावरील बचाव गट बाहेरून, प्रस्फोटक प्रस्फोटित करून जीईएस यंत्रणा कार्यान्वयित करू शकतात, व वैमानिकास सुरक्षित बाहेर काढू शकतात. सीएसएस तंत्रज्ञान विकसित करताना, अतिस्फोटकाचा उपयोग करून विस्फोटक तथा यांत्रिक ऊर्जेद्वारे, काचसदृश क्रेलिकपासून बनविलेल्या विमानछताचे विच्छेदन अत्यंत कमी वेळात केले जाते.

जगभरातील सर्व प्रगत विमानांमध्ये अशा प्रणालीसाठी विमानछत विच्छेदन करायला १४०० मिलिसेकंद वेळ लागतो, तर 'तेजस'साठी तयार केलेल्या सीएसएसला कार्य करायला केवळ १४ मिलिसेकंद लागतात. नियंत्रित प्रस्फोट तरंग प्रसारणाचा (कंट्रोल्ड प्रर्पिगेशन ऑफ डिटोनेशन वेव्ह) उपयोग करून विमानछत विच्छेदन करून, वैमानिकास निर्गमनासाठी सुरक्षित मार्ग मोकळा करून दिला जातो. जर सीएसएस नसेल आणि वैमानिक बाहेर फेकला गेला; तर त्याची मान, कंबर, पाठीचा कणा, गुढघे, पाय व घोटे इथे मोठ्या प्रमाणावर आघात होऊन, वैमानिकास इजा होऊ शकते व तिथेच तो अर्धमेला होऊन अकार्यक्षम होऊ शकतो. म्हणून सीएसएस या वैमानिकाच्या जीवरक्षक यंत्रणेचा वापर अनिवार्य आहे. जर ही यंत्रणा नसेल तर लढाऊ अथवा शिकाऊ विमानाला उड्डाणास परवानगी नसते; इतके सीएसएस महत्त्वाचे आहे.

सीएसएस यंत्रणेमध्ये तीन महत्त्वाचे विभाग आहेत :

१) प्रत्यक्ष विमानछत विच्छेदन करणारा विभाग.

२) प्रारंभिक प्रस्फोटक विभाग, ज्यामुळे सीएसएस कार्यान्वित होते.

३) कार्यान्वित झाल्यावर प्रस्फोट तरंग लहरी अतिशय नियंत्रित पद्धतीने व सुरक्षितपणे वहन करून, वरील दोन्ही विभागांना जोडणारी यंत्रणा.

सीएसएस तंत्रज्ञानातील सर्वात महत्त्वाचे, अत्यंत गुंतागुंतीचे तंत्रज्ञान म्हणजे, उच्च दर्जाच्या अतिस्फोटकांचा खूप नियंत्रित उपयोग करून, शिसासारख्या मऊ धातूच्या आवरणात बनवलेली लघुरूप विस्फोटक रज्जू (मिनीएचराईइड डिटोनेटिंग कॉर्ड– एमडीसी). ही रज्जू म्हणजे दोरीच्या आकारातील एक लवचीक अतिस्फोटक असते. मएमडीसीफ्च्या अतिशय कमी व्यासाचा अतिस्फोटकांचा स्तंभरूप गाभा प्रस्फोट तरंगाद्वारा विमानछत तोडून टाकतो. एमडीसी बनवण्याची प्रक्रिया अतिशय क्लिष्ट असते व खूप वेळ खाणारी असते. तसेच, नियंत्रित ऊर्जा वापर करायचा असल्याने 'एमडीसी'ची गुणवत्ता व विश्वसनीयता


**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**

मिळवण्यासाठीची प्रक्रिया खूप नियंत्रित असून, खूप प्रकारच्या चाचण्या वेळोवेळी घ्याव्या लागतात. शिवाय, अतिविस्फोटक असल्याने खूप काळजीपूर्वक हाताळावे लागते.

प्रारंभिक प्रस्फोटकाद्वारा निर्माण झालेल्या प्रस्फोट तरंगाची गती प्रचंड असते. पाच ते आठ किलोमीटर प्रतिसेकंद गतीने हा प्रस्फोट तरंग एमडीसीला कार्यान्वित करून, विमानछत तोडण्याचे कार्य करतो. यासाठी प्रारंभिक प्रस्फोटक व एमडीसी यांना जोडणारी आणि पूर्ण क्षमतेचे प्रस्फोट तरंग त्याच गतीने वाहून नेणारी यंत्रणा असते. या यंत्रणेत विस्फोटक वहन–सूत्र (एक्स्प्लोझिव ट्रान्स्फर लाईन –ईटीएल) आणि जोडाची पेटी (जंक्शन बॉक्स) यांचा उपयोग करतात. ईटीएल ही 'एमडीसी'प्रमाणेच असते; मात्र याला वेगवेगळ्या पदार्थांच्या धाग्यांनी विणून थरावर थर वेष्टित करतात. हे थर इतके मजबूत करतात की, ज्यायोगे आतून जेव्हा प्रस्फोट तरंग जातात, तेव्हा त्यांचा आतल्या आतच स्फोट होतो; व त्याचा बाहेर काहीच परिणाम होत नाही. याची अशी रचना करण्याचे कारण म्हणजे, या तरंगांमुळे विमानातील अन्य प्रणाली, विभाग व वैमानिक यांचे रक्षण होते; परंतु, विशिष्ट आकार दिलेली एमडीसी मात्र कार्यान्वित होऊन विमानछत विच्छेदन होते.

आज भारत विविध प्रकारच्या कठिणतम चाचण्यांची सुविधा निर्माण करण्यात मागे नसून अग्रेसर होतोय हीच गोष्ट विश्वगुरू भारत होणार याची खात्रीच देत आहे.

भारत माता की जय।

**काशिनाथ देवधर**

◈ ◈ ◈

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता वेल्फेअर सोसायटी**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

# मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग २९

**पाचवा उत्सव – विजयादशमी**

आमच्या धर्म – संस्कृतीचा इतिहास हा विजयाचा, शौर्याचा व पुरुषार्थाचा आहे. पौराणिक उदाहरणांच्या आधारे पुरुषार्थाची आठवण करून देणारा सण म्हणजेच अश्विन शुद्ध दशमी – दसरा अर्थात विजया दशमी. प्रत्येक भारतीयाला या सणाचा गर्व वाटतो. आपण अभिमानाने हा सण साजरा करतो.

संघाच्या उत्सवांच्या नियोजनात या सणाला एक वेगळे महत्त्व आहे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली याच दिवशी करण्यात आली, त्यामुळे संघाचा स्थापना दिवस विजयादशमीचा आहे. संघाची स्थापना या दिवशी झाली म्हणून हा उत्सव साजरा होत नाही तर या दिवसाला हिंदू समाजामध्ये असणारे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता हा उत्सव संघामध्ये साजरा होतो. संघ स्थापनेचा केवळ योगायोग मानता येईल. विजयादशमीच्या निमित्ताने संघाच्या प्रत्येक शाखेवर शस्त्रपूजन केले जाते. इतर उत्सवांपेक्षा या उत्सवाचे स्वरूप वेगळे असते. वर्षभरामध्ये संघाच्या शाखेवर घेतलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांचे प्रात्यक्षिक समाजासमोर सादर केले जाते. या उत्सवाला समाजातील सर्वांना जाहीरपणाने निमंत्रण दिले जाते. संघ स्वयंसेवक पूर्ण गणवेशात या उत्सवाला उपस्थित असतात.

उत्सवापूर्वी अथवा उत्सवानंतर सोयीनुसार शाखेच्या परिसरातून गणवेशधारी स्वयंसेवकांचे पथसंचालन काढले जाते. या पथसंचलनातून संघ शाखेवर न आलेल्या हिंदू समाजाला संघ शिस्तीचे व संघ शक्तीचे दर्शन घडवावे हाच हेतू असतो. पथसंचलनामध्ये संघाने विकसित केलेल्या व भारतीयत्वाचा स्पर्श असलेली वाद्ये अर्थात घोष वाजविला जातो. पथसंचलनाचे परिसरातील लोक उत्साहाने सडा – रांगोळी करून व पुष्पवृष्टी करत स्वागत करतात.

प्रत्यक्ष शाखेवर वेगवेगळ्या प्रकारची प्रात्यक्षिके करून दाखविली जातात, कार्यक्रमात उपस्थित असणारे प्रमुख अतिथी संघाबद्दलच्या भावना व्यक्त करतात. प्रमुख वक्ते आपल्या मार्गदर्शनातून संघ कामाचा आढावा घेऊन संघ कामाची गरज समजावून सांगतात. शौर्य – पुरुषार्थाचा हा उत्सव संघाचे स्वयंसेवक अत्यंत उत्साहाने साजरा करतात. संघ स्थापनेचा वर्धापन दिन असल्यामुळे या दिवशी संघ कामाचे सिंहावलोकन झाल्यामुळे संघ स्वयंसेवक आत्मचिंतन करतात व आपल्याला आणखी काय करायला हवे याचा विचार करत नवी योजना स्वीकारून नव्या उत्साहाने कामाला लागतात. हिंदू समाजाचे संघटन करत असताना हिंदू समाजामध्ये स्वत्वजागृती व आत्माभिमान निर्माण करण्यासाठी या उत्सवाचा संघाने आजपर्यंत उपयोग केला आहे, आमच्या देशाचा खरा इतिहास जाणून घेण्यासाठी समाजाला प्रवृत्त केले आहे. या उत्सवातून मिळणाऱ्या ऊर्जेतून स्वयंसेवक पुन्हा कार्यरत होतात व समाज व राष्ट्राची सेवा करताना दिसून येतात.

**सहावा उत्सव – मकरसंक्रमण**

संघाचे काम हे हिंदू समाजाचे संघटन करण्याचे आहे. ज्या समाजाला आपण संघटित करणार आहोत, त्या समाजाला आपण संघटित व्हावे असे वाटण्यासाठी काही आकर्षणाच्या गोष्टी असाव्या लागतात. संघामध्ये सत्ता नाही, पैसा नाही, प्रसिद्धी नाही, मोठेपणा नाही, मान – सन्मान नाही, मग लोक संघाचे ऐकतील कसे? परंतु हिंदू समाजाला संघटित करणे हा

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक पुणे स्टाफ वेल्फेअर असोसिएशन**

तर संघाचा मुख्य उद्देश आहे. हिंदू समाजाला जोडण्यासाठी संघ स्वयंसेवकाकडे कोणतेही आकर्षण नाही. केवळ एक आणि एकच गोष्ट आहे ती म्हणजे प्रेम व आत्मियता.

संघ स्वयंसेवक एकमेकांना प्रेमाने व आत्मियतेनेच जोडण्याचे काम गेल्या शंभर वर्षांपासून करत आले आहेत. प्रेमाने व आत्मियतेने जोडण्याचा हिंदू धर्मातील सण म्हणजेच मकर संक्रांत. याच मकर संक्रमण सणाचा उपयोग संघाने आपल्या उत्सवाच्या योजनेत केला आहे. समाजामध्ये अनेक प्रकारचे – अनेक विचारांचे लोक असतात. कोणत्यातरी कारणाने हे लोक एकमेकांपासून दुरावलेले असतात, अशा दुरावलेल्या हिंदू समाजाला एकसंध करण्यासाठी मकर संक्रमणासारखा दुसरा उत्सव नाही, त्यामुळेच संघाने देखील प्रारंभापासून हिंदू समाजाला संघटित करण्यासाठी या उत्सवाचा कौशल्याने उपयोग केला आहे. तिळगुळ घ्या गोड बोला हे केवळ म्हटले जात नाही तर तसे आचरणातही आणण्याचा प्रयत्न समाजाकडून होतो हीच गोष्ट लक्षात घेऊन मकर संक्रमणाच्या निमित्ताने संघाचे स्वयंसेवक समाजामध्ये जातात व तिळगुळ देऊन प्रेमाने – आत्मियतेने या समाजाला संघ कार्याशी जोडण्याचा प्रयत्न करतात, आपण सारे बंधू आहोत ही भावना दृढ करतात.

संघाच्या शाखांवर इतर उत्सवांप्रमाणे हाही उत्सव होतो. या उत्सवाचे देखील समाजाला जाहीरपणाने निमंत्रण दिलेले असते, त्यामुळे स्वयंसेवकाव्यतिरिक्त इतर लोकही या उत्सवात सामील होतात. एकमेकांना तिळगुळ दिले जाते. प्रमुख वक्ते सणाचे औचित्य साधून हिंदू समाजातील बंधुभाव कसा वृद्धिंगत करता येईल व त्याची कशी आवश्यकता आहे याचे विवेचन करतात. शाखेवरील उत्सव संपल्यानंतर स्वयंसेवक शाखेच्या परिसरातील घराघरांमध्ये जाऊन तिळगुळ देतात. या सणाचे महत्त्व सांगणारे पत्रकही वितरित केले जाते. विशेषतः ज्या भागांमध्ये आपण आजपर्यंत पोहोचू शकलो नाही, अशा भागांमध्ये स्वयंसेवक जातात. शक्य असल्यास तेथील समाजाला एकत्रित करून आणखी एखादा उत्सव करतात अथवा घरोघरी जाऊन तिळगूळ देतात. समाजातील मान्यवर, प्रतिष्ठित, वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असणारे सरकारी अधिकारी अशा व्यक्तींशी आवर्जून संपर्क केला जातो, त्यांना देखील तिळगुळ देऊन समाजासाठी निस्वार्थ भावनेने काम करण्याची त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त केली जाते.

प्रेमाने व आत्मियतेने हिंदू समाजाला जोडण्याचा मकर संक्रमणाच्या सणाचा संघाने उपयोग केला आहे व या सणाच्या माध्यमातून समाजामध्ये बंधुभाव जागृत केला आहे, याचाच परिणाम म्हणून अलीकडच्या काळामध्ये हिंदुत्वाची अनुकूलता निर्माण झाल्याचे आपण पहात आहोत. हिंदू समाजाचे संघटन करण्यासाठी संघाने सहा उत्सवांची जी रचना केली आहे, त्याचा आजपर्यंतच्या संघ कार्यात निश्चितच मोठा परिणाम व लाभ झाला आहे.

**– डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**

◈ ◈ ◈

संवाद

# संवाद ट्रेंडप्रिंट्स

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३०  दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**

**जनता बँक गणेशोत्सव मंडळ**

# मानसिक आरोग्य - मनःशांती (अर्थात डॉक्टरांसाठी)

आता तरी पुढे सावध व्हावे । गेले ते जावे भूलू नका ।।

संत तुकाराम

या वेळेचा विषय हा माझ्या सर्व डॉक्टर मित्रांसाठी अत्यंत उपयुक्त आणि महत्त्वाचा आहे हे आपण सर्व जाणताच; कारण सर्व प्रकारची रुग्णसेवा देत असताना स्वतःच्या आरोग्याकडे मात्र त्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असते. आणि त्याची जाणीव खूप उशिरा एखादा आरोग्य संबंधी फटका बसला असताना होते, आणि मग आपण सर्वजण आपली जीवनशैली बदलून आपले आरोग्य तंदुरुस्त ठेवण्याचा प्रयत्न करत राहतो.

'हेल्थ इज वेल्थ' किंवा आरोग्यम् धनसंपदा हा उपदेश मात्र आपण सर्वजण इतरांना सतत देत असतो. परंतु स्वतःसाठी मात्र तो पूर्णपणे विसरून जातो.

लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण अशीच बहुतेक ७०-८०टक्के डॉक्टरांची स्थिती असते. त्यामुळेच अनेकदा आपल्या व्यवसायामध्ये-कामामध्ये अत्यंत व्यग्र असताना अथवा उमेदीच्या काळात सतत वर्कोहोलिक राहिल्यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जाते. याचा परिणाम म्हणूनच की काय काही जणांना अचानक अपमृत्यू येतात, हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब वगैरे सारखे आजार जडतात आणि आपण या आजारांचे शिकार बनतो. म्हणून कुठे थांबले पाहिजे की जेणेकरून आपल्या आरोग्याचा विचार हा प्रथम करून आपण स्वतः तंदुरुस्त कसे राहिले पाहिजे याकडे प्रत्येकाने लक्ष देणे आवश्यक आहे असे मला माझ्या डॉक्टर मित्रांना कळकळीचे सांगणे आहे.असो.

स्वतःचा फिटनेस राखण्यासाठी आणि आपली शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी अनेक डॉक्टर्स वेळात वेळ काढून वेगवेगळ्या प्रकारचे व्यायाम,खेळ, प्राणायाम, योगा वगैरे करीतच असतातच परंतु शारीरिक स्वास्थ्य बरोबर मानसिक स्वास्थ्य ही तेवढेच महत्त्वाचे आहे; आणि डॉक्टरांच्या बाबतीत तर त्याचा जीवनात खूप मोठा सहभाग आहे हे मात्र खूप जण विसरून जातात.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताणतणाव, आर्थिक प्रश्न. कौटुंबिक अडचणी, वेळेची सांगड घालणे, सिरीयस रुग्णांचे टेन्शन, त्याच्या नातेवाईकांना सांभाळणे, समाजात डॉक्टरांची होणारी पिळवणूक, डॉक्टरांवरील होणारे हल्ले, समाजातील आपली प्रतिमा डागाळण्याची भीती आणि ती जपण्यासाठीचे प्रयत्न, इतर सहकाऱ्यांबरोबर स्पर्धा, अद्ययावत संशोधन, अनेक नवीन नवीन तंत्रज्ञान मिळवून स्वतःला या स्पर्धेत टिकवून ठेवणे या सर्व गोष्टींनी सध्या डॉक्टरांचे मानसिक संतुलन तर बिघडते; परंतु हा ताणतणाव असह्य झाला तर शारीरिक तंदुरुस्ती कितीही असली तरी तो मानसिक रित्या ढासळतो. मग तो व्यसनाधीन तरी होतो, काही मोठ्या आजारांचा शिकार होतो किंवा त्या डिप्रेशन मधून बाहेर येण्यासाठी गोळ्या घेत राहतो.

म्हणूनच त्याला मानसिक स्वास्थ्याची मनःशांतीची अत्यंत गरज आहे तरच त्याचा फिटनेस हा सर्वार्थानी खरा ठरेल.

ती मनःशांती कशी संपादन करावी याविषयी आज मी थोडीशी माहिती देणार आहे. ती उपयुक्त व्हावी अशी अपेक्षा.

आपल्या आयुष्यातील २४ तासांमधील निदान दोन तास तरी आपण स्वतःसाठी दिले पाहिजेत त्यातील एक तास शारीरिक व्यायाम आणि तंदुरुस्तीसाठी, तर उरलेला आणखी एक तास हा मनस्वास्थ्यासाठी राखून ठेवावा.

कोणत्याही शारीरिक व्यायामाचा अतिरेक वाईट. कुठे थांबले पाहिजे हे प्रत्येकाने आपल्या वयानुसारच ठरवले पाहिजे आणि आपल्याला झेपेल तेव्हढाच व्यायाम करावा.

रोज सकाळी उठल्यावर अर्धा तास आणि रात्री झोपण्या अगोदर अर्धा तास शांतपणे एका जागी बसून नियमितपणे रोज मन शांत ठेवून नाम साधना अथवा ध्यान धारणा करावी. त्यासाठीच आपल्या सर्व संतांनी आपल्याला ध्यान धारणेचा, नामस्मरणाचा उत्तम मार्ग दाखवून दिला आहे.

**मनस्वास्थ्य-मन:शांती साठी नामस्मरणाचे फायदे**

मनातील ताण तणाव कमी होतो, आपली विचारशक्ती-स्मरणशक्ती वाढते, उत्साह आणि ऊर्जा वाढून कार्यक्षमतेने काम करता येते, आपल्या अडचणींवर उत्तर मिळते, आपल्या कठीण परिस्थितीमध्ये आणि संकट काळात आपल्याला कोणाचा तरी भक्कम आधार आहे याची खात्री पटते. मृत्यूचे भय वाटत नाही. काम क्रोध,लोभ,मोह या सर्वांवर मात करता येते, आपली वागणूक सुधारते, सर्वांशी आनंदाने शांततेने वागल्यामुळे आपला दिवस उत्तम सुखासमानात जातो.

**नामस्मरण कसे करावे**

रोज सकाळी उठल्यावर कमीतकमी अर्धा तास आणि रात्री झोपण्या अगोदर अर्धा तास शांतपणे एका जागी बसून नियमितपणे रोज मन शांत ठेवून नाम साधना अथवा ध्यान धारणा करावी.हळूहळू साधनेचा वेळ वाढवावा. त्यासाठी सुखासनात बसून नासिका ग्रह दृष्टी ठेवून, मन एकाग्र करून आपल्या श्वासामध्ये आपल्या इच्छित देवाचे नामस्मरण केल्यास आपले मन खूप शांत होते. सुरुवातीला मनामध्ये अनेक कल्पना, चांगले- वाईट विचार सतत येतात पण ते बाजूला सारून फक्त परमेश्वराच्या नामावर आणि श्वासावर नाम एकत्र करण्याचा प्रयत्न केला तर ते सर्व आपोआप दूर होऊन आपले मन अत्यंत शांत होते. आणि खूप साधना झाल्यावर देवाच्या दर्शनाचा साक्षात्कारही होतो असे आपल्या सर्व संतांनी सांगून ठेवले आहे. म्हणून सद्गुरूंकडून मिळालेले सबीज नाम असेल तर ते सर्वोत्तमच. काही ध्यानाच्या प्रक्रियांमध्ये मन पूर्ण रिकामे करून शून्यावर एकाग्र करावे असे सांगितले आहे परंतु ते करणे खूपच अवघड असते कारण मन कितीही रिकामे केली तरी त्यात काही ना काही तरी कल्पना येत जात असतात. म्हणून ते देवाच्या नामावर एकाग्र करण्याची पद्धत सर्वात उत्तम होय.

आपल्या सर्व संतांनी आपल्याला म्हणूनच ध्यान धारणेचा, नामस्मरणाचा उत्तम मार्ग दाखवून दिला आहे.

सुरवातीला घेतलेल्या अभंगात म्हणूनच संत तुकाराम महाराज म्हणतात, आता तरी पुढे सावध व्हावे / गेले ते जावे भूलू नका.

आता उरलेल्या आयुष्यात तरी जागे व्हा. सावध होणे म्हणजे केवळ शारीरिक तंदुरुस्ती आणि सतर्कताच नव्हे तर मानसिक व आत्मिक जागृती ही हवीफ खरा सुखाचा,उत्तम स्वास्थ्याचा शोध घेणे म्हणजेच सावध होणे होय. आतापर्यंत जे झाले ते जाऊ दे आणि यापुढे तरी वेळ दवडू नका. घर, जमीन, पैसा याची आसक्ती कमी करून भविष्याची चिंता न करता स्वतःचे आरोग्य संभाळा. स्वतःसाठी वेळ काढा. उत्तम वाचन, सत्संग आणि नामस्मरण यांच्या सतत सहवासात राहा. हाच महत्त्वाचा संदेश या अभंगातून आपल्या सर्वांसाठी श्री तुकाराम महाराजांनी दिला आहे.

'वर्तमानात जगा आणि आजचा दिवस देवाने दिलेली उत्कृष्ट भेट आहे याची जाण ठेवून आनंदी कसा जाईल यावर भर द्या.' संत एकनाथ महाराजांनी भागवतात शांतीचे महत्व सांगून ठेवले आहे,

शांती म्हणजे ऐंशी। सागरी अक्षोभ्यता जैशी ।
ओहट नाही तिशी । सर्व देशी सर्वदा।।
शांती म्हणजे अशी की समुद्राची अक्षुब्धता
तिला कुठेही भरती ओहोटी नाही.

स्वार्थाला विरोध करणारी कदापिही विचलित न होणारी हीच खरी शांती.

आहार विहारावर नियंत्रण, जिभेवर ताबा, व्यसनांपासून दूर आणि नियमित व्यायाम, टेंशन फ्री जीवन, क्षमाशील वृत्ती आणि दररोज थोडा वेळ नियमितपणे नामसाधन केल्यास मनःशांती आणि उत्तम मनस्वास्थ्य लाभेल यात शंकाच नाही. म्हणूनच म्हणतात,

''Meditation is medicine"

**डॉक्टर संजीव दात्ये**
**कन्सल्टिंग जनरल सर्जन, चिंचवड**

**विश्व हिंदू परिषदेच्या कार्यास शुभेच्छा!**
**जनता बँक पुणे कला क्रिडा मंडळ**


जनसेवा सहकारी बँक लि.,
हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
जनसेवा
घरकुल कर्ज
रो हाऊस, बंगला, फ्लॅट खरेदीसाठी
किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)
Processing Fee
0%
Rate of Interest
7.50%*
Onwards
जनसेवा
शैक्षणिक कर्ज
देशांतर्गत तसेच परदेशातील
शिक्षणासाठी कर्ज उपलब्ध.
Processing Fee
0%
Rate of Interest
8.90%*
Onwards
* अटी लागू
मुख्य कार्यालयः प्लॉट क्र. १४,
हडपसर इंड. इस्टेट, पुणे १३.
फोनः ०२०-२६७०४३०० ते ०४ (५ लाईन्स)
www.janasevabankpune.bank.in

वार्षिक वर्गणी रु. २००/– फक्त
Date of Publication : 26/05/2026 and
Date of Posting : 28/05/2026 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध (मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे 'हिंदुबोध'.

● मासिक मुल्य रु. २०/– ● वार्षिक वर्गणी रु. २००/– ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/–

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## ❋ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ❋

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रु. १.५ लाख |
| साधे पान | रु. १ लाख |
| साधे अर्धे पान | रु. ५०,०००/– |
| साधे १/४ पान | रु. २५,०००/– |
| साधे १/८ पान | रु. १२,०००/– |
| साधे १/१६ पान | रु. ६,०००/– |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रु. २,१००/– |
| हिंदुबोध अंक मुल्य | रु. २०/– |
| वार्षिक वर्गणी | रु. २००/– |
| त्रैवार्षिक वर्गणी | रु. ५००/– |

## ❋ हिंदुबोधची वर्गणी ❋

जनता सहकारी बँक लि. शनिवार–नारायण पेठ शाखा, पुणे – ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे – ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२

विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,

भारत भवन, पुणे – ४११ ००२.

दूरध्वनी : ०२०–२४४७१७०१